# राष्ट्रीय एकात्मतेत सरदार पटेलांचे योगदान

**प्रा.एस.एस. तायडे** राज्यशास्त्र विभाग प्रमुख मधुकराव पवार कला महाविद्यालय, मुर्तिजापूर,जि. अकोला.
Email- sstayade.mpcollege@gmail.com **मो.नं. - ९७३०८२७८३१**
**प्रा. डॉ. पी.एच. सुर्यवंशी** राज्यशास्त्र विभाग प्रमुख राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय, नांदगाव खंडेश्वर, जिल्हा अमरावती **मो. न. - ९४२३६२२४३५**

---

**सारांश:-**
सरदार वल्लभभाई पटेल यांना देशाच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात 'लोह पुरुष' म्हणुन अत्यंत आदराने गौरविले गेले आहे. महात्मा गांधी यांच्या जवळचे सहकारी म्हणुन सरदार पटेल स्वातंत्र्य चळवळीत अग्रेसर होते. त्यांचे व्यक्तिमहत्व अत्यंत वैशिष्टपूर्ण होते. आपल्या उत्तम संघटन कौशल्य, मुत्सद्दी निती, कामावर असणारी प्रचंड निष्ठा इं. अंगीभूत गुणामुळे त्यांनी ५५० हून अधिक संस्थानांचे स्वातंत्र भारतात विलीनीकरण करुन त्यांनी एकसंघ भारत उभा करुन भारतीय जनतेत एकात्मतेची भावना निर्माण केली.

**प्रस्तावना:-**
भारतीय स्वातंत्र्यलढयात व त्यानंतरच्या स्वातंत्र्योत्तर भारतात वल्लभभाईना मानाचे स्थान आहे. एकात्म भारताचे ते खरे शिल्पाकार असुन कॉंग्रेसच्या पक्ष संघटनात्मक कार्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. भारताचा पोलादी पुरुष म्हणुन त्यांची जगभर ख्याती आहे.

१९४६ मध्ये हंगामी मंत्रीमंडळात ग्रहमंत्री म्हणून ते समाविष्ट होतेच पण घटनापरिषदेचे सक्रिय सभासदपण होते. सरदारांचे सर्वात मोठे महत्वाचे व राष्ट्रीय ऐक्याचे काम म्हणजे संस्थानाच्या विलनीकरणाचे काम होय हैद्राबाद, जुनागढ व काश्मीर सोडून इतर सुमारे ५५० संस्थाने भारतात विलीन केली पुढे त्यांनी हैद्राबाद संस्थानाही पोलीस कारवाई करुन खालसा केले.

प्रसिध्द सोरटी सोमनाथ मंदिराच्या पुनरज्जीवनासाठी व व्यवस्थेसाठी त्यांनी एक विश्वस्त निधी उभा केला. अस्पृश्यांना त्या देवळात प्रवेश व पूजा करण्याचा हक्क विश्वस्त पत्रकात वल्लभाईनी नमूद केला. तसेच सर्व धर्माच्या व्यक्तींना खुल्या प्रवेशाची तरतुदही त्यात नमुद केली, ही त्यांची इच्छा १९५१ मध्ये पुर्ण झाली.

**सरदार पटेल पुर्वचरित्र :—**
सरदार वल्लभभाई पटेलांचा जन्म गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील नदियाद येथे ३१ ऑक्टोंबर १८७५ रोजी एका शेतकरी कुटूंबात झाला. करमसाद या गावी त्यांची वडिलार्जित शेती होती. झव्हेरीभाई हे त्यांचे वडील होय. त्यांच्या आईचे नाव लाडबाई त्यांच्या कुंटूबावर स्वातंत्र चळवळीचा प्रभाव होता. वडिलांनी १८५७ च्या स्वातंत्र्ययुध्दात भाग घेतला होता. त्यामुळे वल्लभभाई वर घरीच राजकीय संस्कार झाले होते.

१८९७ साली ते मॅट्रीक झाले घरच्या गरिबीमुळे त्यांना महाविदयालयीन शिक्षण घेता आले नाही ते त्यावेळी वकिलाची परिक्षा उत्तीर्ण झाले. वकिलीत पैसे मिळवून बॅरिस्टर होण्याची महत्वकांक्षा होती. १९१३ मध्ये ते बॅरिस्टर होवून इंग्लडमधुन भारतात आले व त्यांनी अहमदाबादला वकिली सुरु केली.

**स्वातंत्र्यचळवळीत सरदार पटेलांचा सहभाग:-**
१९१७ साली महात्मा गांधी अहमदाबादला आल्यानंतर गांधीच्या सहवासाने वल्लभभाई पुर्णत बदलले व त्यांनी खेडा सत्याग्रहात हिरारीने भाग घेतला व तो लढा यशस्वी करुन दाखविला शेतसाऱ्याच्या वसुली विरुध्द खेडा जिल्हयातील हजारो शेतकऱ्यांची चळवळ उभारुन या चळवळीचे नेतृत्व सरदार पटेलांनी अत्यंत निर्धाराने केले यातूनच सरदार पटेल यांचे नेतृत्व भारतीय स्वातंत्र्य चळवळीत उदयास आले व महात्मा गांधीच्या सहवासात ते वाढले आणि एक कणखर धाडसी नेता म्हणून लौकिक प्राप्त झाले.

सन १९२०-२२ या काळात भारतीय पातळीवर असहकार चळवळ सुरु झाली या चळवळीत सरदार पटेल यांनी सहभाग घेवून आपलं योगदान दिले. १९२३ साली नागपूरच्या झेंडा सत्याग्रहाचे नेतृत्व सरदार पटेलांकडे होते. त्यांनी तो सत्याग्रह यशस्वी केला. १९८८ साली बार्डोलीत करबंदीची चळवळ अत्यंत जोरात सुरु झाली या लढ्याची संपुर्ण योजना वल्लभभाईची होती. फेब्रुवारी १९२८ ते ऑक्टोंबर १९२८ पर्यंत हा लढा चालू होता. त्यात त्यांना घवघवीत यश मिळाले त्यांचे नाव सर्व भारतभर पसरले याच वेळी त्यांनी जनतेने सरदार ही पदवी बहाल केली. १९३० साली मिठाच्या सत्याग्रहात भाषणबंदीचा वटहुकुम मोडून रासगावी त्यांनी भाषण केले. त्यामुळे त्यांना शिक्षा व तुरुंगावास भोगावा लागला.

या नंतरच्या काळात सरदार पटेल सतत महात्मा गांधीच्या प्रेरणेने व सहवासाने भारतीय स्वातंत्र्य लडयात सक्रिय राहिले व भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वेगवेगळया महत्वपूर्ण पदांवर त्यांनी कार्य केले. सरदारांचे कर्तुत्व व कॉग्रेसमधील कार्य यांचा विचार करून त्यांना कराची काँग्रेसचे अध्यक्षस्थान देण्यात आले.

**संस्थानाचे विलीनीकरण व सरदार पटेल:-**

स्वातंत्र भारताच्या राज्य कारभार पाहण्याकरिता पंतप्रधान पंडित नेहरूच्या नेतृत्वाखाली मंत्रीमंडळ अधिकारावर झाले. या मंत्रीमंडळात सरदार पटेल उपपंतप्रधान झाले त्यांच्याकडे गृहखाते माहिती व नभोवाणी खाते, संस्थांनाचा प्रश्न व निर्वासितांचे पुर्नवसन इ. खात्यांची जबाबदारी होती, सरदार पटेल यांनी तात्कालीन ५६५ संस्थानाचे स्वतंत्र भारतात विलीनीकरण करुन एकसंघ भारत निर्माण केला. ही सरदार पटेल त्यांची मोठी ऐतिहासिक कामगिरी आहे.

५ जुलै १९४७ रोजी हंगामी सरकारची संस्थानांबाबतची भूमिका विशद करणारे ऐतिहासिक निवेदन सरदार पटेलांनी काढले. भारताचे प्रांतामधील नागरिक असोत अथवा संस्थानातील प्रजाजन असोत हे सर्व भारतीयच आहेत. एका रक्तमासाचे व संस्कृतीचे आहेत म्हणुन स्वातंत्र्याचा सुर्य उदयाला येत असतांना सर्वांनी एकत्र येण्यातच सुज्ञपणा आहे असे न झाल्यास विनाश ओढवेल तो टाळण्यासाठी संस्थानिकांनी भारतात सामील होण्यासाठी पुढे यावे असे अतिशय कळकळीचे आवाहन पटेलांनी केले.

सरदार पटेलांच्या या अहवानाला प्रतिसाद देत भारतातील बहुसंख्य संस्थांनानी भारतात सामील होण्याच्या करारपत्रावर स्वाक्षऱ्या केल्या जुनागढ, हैद्राबाद व काश्मीर ही संस्थाने सोडुन इतर सर्व संस्थाने भारतात सामील झाली होती.

संस्थानांचे भारतात झालेले सामीलीकरण ही आधुनिक भारताच्या इतिहासातील अतुलनीय अशी रक्तहीन क्रांतीच होती अन ही क्रांती यशस्वी करण्यात सरदार पटेलांचा सिंहाचा वाटा होता. संस्थानिकांनी स्वतंत्र होण्याचा दुराग्रह अखेरपर्यंत रेटुन पाहिला होता. स्वतंत्र भारत भविष्यात कधी बलशाली होवू नये म्हणून भारताची अनंत शकले करण्याचा कुटिलडाव ब्रिटिश मुत्सद्दी रचत असल्याची माहिती संस्थानिकांना असल्यामुळे त्याचा उपयोग स्वातंत्र्य मिळविण्यासाठी करुन घेण्याचा संस्थानिकांनी प्रयत्न करुन पहिला होता. संस्थानात अमाप साधनसंपत्ती होती. सुसज्ज लष्कर होते या स्थितीत जर संस्थाने स्वतंत्र झाली आसती तर स्वतंत्र्य भारताचे प्रादेशिक अखंडत्व. राजकीय स्थैर्य व सुरक्षितता यांना कायमचा धोका निर्माण झाला असता. विकासाच्या मार्गात मोठया प्रमाणात अडथळे निर्माण झाले असते आणि हेच साम्राज्यवादी ब्रिटिश मुत्सदयांना हवे होते. परंतु हा धोका सरदार पटेलांच्या चाणक्य बुध्दीने हेरला होता. पटेलांच्या पोलादी खंबीर नेतृत्व, समयसुचकता, दुरदृष्टी, लवचिकता व्यवहार कौशल्य व मुत्सदेगिरी व व्ही.पी. मेनन सारख्या अनुभवी व कर्तबगार मदतनिसाची त्यांना मिळालेली साथ यामुळे अत्यंत जटिल बनलेल्या संस्थानांची समस्या त्यांनी समाधानकारक रित्या सोडली.

भारतात सामील होण्यासाठी संस्थानिकांचे मन वळविण्यात सरदार पटेलांना जे भरघोस यश मिळाले त्यामुळे स्वतंत्र भारताच्या सीमेत बसलेल्या संस्थानांना स्वतंत्र्य येवुन भारताचे प्रादेशिक ऐक्य नष्ट करण्याचा ब्रिटिशांचा प्रयत्न फसला. स्वातंत्र्य भारत एक संधी ठेवण्याच्या कार्यातील सरदारांची भुमिका ऐतिहासिक महत्वाची ठरते. मुख्य म्हणजे बळाचा वापर न करता आपल्या कुशल मुत्सदेगिरीने भारतात सामील होण्यासंबंधीच्या संस्थानिकांच्या मनातील आशंका दूर करुन, त्यांचा मान व प्रतिष्ठा स्वतंत्र भारतात सुरक्षित राहिल. याबद्दल त्यांना नुसते अश्वासन न देता ते तंतोतंत पाळुन त्यांचा विश्वासही सरदार पटेलांनी संपादन केला.

सरदार पटेलांच्या या अतुलनीय कामगिरीबद्दल त्यांच्या सहकार्यांनी व समकालीन मुत्सदयांनी त्यांची मुक्तकंठाने प्रशंसा केली, जॉफ्रे टायसन व बेरा डीन सारख्या परकीय इतिहासकारांनी ही संस्थानिकांना भारतात सामील करुन होण्याचे प्रचंड व महाकठीण कार्य अत्यंत द्रुतगतीने यशस्वीरित्या झाल्याचे श्रेय सरदारांच्या कुशल मुत्सदेगिरीला दिले आहे.

**समारोप :-**

सरदार पटेल वृत्तीने अत्यंत कणखर जरी होते तरी ते धार्मिकच परंपरागत विचारसरणीचे होते. ते स्वतःला एक सामान्य शेतकरी समजत असे, शेतकऱ्यांत स्वाभिमान निर्माण झाला यात आपण कृतार्थ झालो असे ते मानीत साधी राहणी, उच्च विचारसरणी व तात्काळ कृति यांवर त्यांचा भर असे, जवाहरलाल नेहरूंचा समाजवाद त्यांना मान्य नव्हता, ते पुर्णत वास्तववादी होते नेहरू व पटेल यांना दोघांनाही व्यक्तीगत मतभेदांपेक्षा देशांचे कल्याण व भविष्य श्रेष्ठ वाटत होते म्हणुनच महात्मा गांधी या दुव्यामुळे ते एकत्र काम करित राहिले.

स्वतःच्या इच्छेप्रमाणे सर्व गोष्टी घडवुन आणणारी चाणाक्ष बुध्दी, कठोर शिस्त व परिस्थितीचे विलक्षण आकलन हे. राजकारणी मुत्यद्दयाला आवश्यक असणारे गुण त्यांच्यात होते. कोणत्याही प्रश्नाकडे ते फलप्रामण्यवादी दृष्टीकोनातुन पाहत म्हणुनच त्यांना 'द टाइम्स' या वृत्तपत्राने त्यांचा गौरव बिस्मार्कपेक्षा श्रेष्ठ राजकारणपटू असा केला आहे.

**संदर्भ सूची:-**

१. विष्णू प्रभाकर-सरदार वल्लभभाई पटेल -नॅशनल बुक ट्रस्ट- आवृत्ती २०१५

२. नरहरी पारिख - सरदार वल्लभभाई, भाग-२

३. दिनकर जोशी - महामानव सरदार पटेल

४. डॉ. सुमन वैद, डॉ.शांता कोठेकर आधुनिक भारताचा इतिहास (१९२०-१९४७) साईनाथ प्रकाशन, नागपुर.

५. डॉ. जयसिंगराव पवार - भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास- निराली प्रकाशन

६. रावजीभाई पटेल -हिंद के सरदार

७. दत्त राजनी पाम - आजचा हिंदुस्थान